| | |
|---|---|
| | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६८/२०२६ मधील निशाणी क्र.०१ वरील आदेश**<br>जयश्री व इतर वि. निरंक<br>(आदेश पारीत दिनांक – ०६.०४.२०२६)<br>CNR No.MHLA060002792026 |

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम,१८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे संक्षिप्त कथन असे की, नामे वैभव बाळकृष्ण रुईकर यांचा दिनांक २३.१०.२०२५ रोजी नाइन पर्ल्स हेल्थ केअर प.ली.वल्लभनगर, मुंबई नाका जवळ नाशिक येथे मयत झाले आहेत. (तद्नंतर 'वैभव बाळकृष्ण रुईकरे' यांना वाक्यांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने 'मयत वैभव' असे संबोधण्यात येईल). मयत वैभव यांचे समयीचे कायदेशीर वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नांव | मयताशी नातेसंबंध |
|---|---|---|
| १. | जयश्री वैभव रुईकर | पत्नी |
| २. | बाळकृष्ण वैभवपाटील रुईकर | मुलगा |
| ३. | आदित्य वैभवपाटील रुईकर | मुलगा |

०३. अर्जदारांचे कथन असे की, वरील वारसदारां व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने मयताच्या मृत्यू पश्चात विविध कार्यालयीन कामकाजासाठी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सादर केला आहे.

०४. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे नियम १ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्यांचे आत अर्जदाराचे हक्कावैभवत आक्षेप घेण्यासाठी त्यांचे आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. नियम ७ चा दुसरा भाग हा असे विदित करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसुन, ते फक्त सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था व्यक्तीचे वारसासाठी दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमत: हक्क निर्णित करीत नाही किंवा इतरांचे हक्कास इजा/हानी पोहोचवित नाही.

०५. अर्ज दाखल झाल्यानंतर दिवाणी न्यायालय क.स्तर, तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय व ग्राम पंचायत कार्यालय, रुई, ता.अहमदपूर जि.लातूर यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (निशाणी क्र.७) प्रसिध्द करण्यात आला. अर्जदारांच्या विनंतीस कोणाचा आक्षेप आहे काय ? यात न्यायालयाच्या आदेशान्वये अर्जदाराने दिनांक ११.०२.२०२६ रोजी ''दैनिक राजधर्म'' वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रगटन (निशाणी १०) प्रसिध्द करण्यात आले. परंतु आजतागायत सदर प्रकरणामध्ये कोणाचाही आक्षेप/उजर प्राप्त झाला नाही.

०६. प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्ठयर्थ अर्जदारांनी (निशाणी १३) अन्वये जयश्री वैभव रुईकर यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. तसेच अर्जदाराने त्यांच्या स्वत:च्या आधार कार्डची सत्यप्रत दाखल केलेली आहे. सदर प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्याने त्यांच्या प्रतिज्ञापत्रात अर्जातील कथनांचा तंतोतंत समावेश केला आहे. कथनांची पुनरावृत्ती टाळण्याच्या हेतूने त्याच्या प्रतिज्ञापत्रातील कथने याठिकाणी मांडण्याची आवश्यकता नाही. शिवाय अर्जदारांनी उपनिबंधक, महानगर पालिका, नाशिक, ता., जि. नाशिक यांनी निर्गमित केलेले मयताचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी ११) व  वारसाचे स्वयंघोषणापत्र (निशाणी १२) वर दाखल केले आहेत. सदर मृत्यूपत्राचे अवलोकन केले असता त्यामध्ये मयत वैभव याचे दिनांक २३.१०.२०२५ रोजी मौजे नाशिक, ता., जि. नाशिक येथे मृत्यु झाल्याचे दिसून येते. तसेच वारसाचे प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, त्यामध्ये अर्जदार हे मयत वैभव याचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार यांनी (नि.क्र.१४) कडे त्यांचे आधारकार्ड ओळखपत्राची पडताळलेली प्रत दाखल केली. तद्नंतर अर्जदाराने (निशाणी १५) अन्वये पुरसिस सादर करुन त्यांचा पुरावा बंद केला.

०७. अर्जदाराच्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर विश्वास ठेवण्यास हरकत नाही. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अद्याप कोणाचा आक्षेप नसल्यामुळे मयत वैभव यांना अर्जदार व वरील नमुद हे कायदेशीर वारस असल्याचे ग्राहय धरण्यास हरकत नाही. उपरोक्त विश्लेषणाअंती अर्जदार व वरील नमुद वारसांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता अर्जदार व वरील नमुद हेच मयत वैभव यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येते.

२. अर्जदार नामे ०१. जयश्री वैभव रुईकर, ०२. बाळकृष्ण वैभवपाटील रुईकर व ०३. आदित्य वैभवपाटील रुईकर सर्व रा. रुई, ता.अहमदपूर जि.लातूर ह.मु. फ्लॅट नं. ३ श्रम साफल्य अर्पाटमेंट, न्यु इरा इंग्लीश स्कुलच्या पाठीमागे, गोविंद नगर, व्ही.टी.सी. नाशिक ता.जि. नाशिक व हे मयत वैभव बाळकृष्ण रुईकरे रा. रुई, ता.अहमदपूर जि.लातूर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते व सदरचा वारसा दाखला हा अर्जदार यास देण्यात येते.

३. दिवाणी पुस्तिका प्रकरण क्र.१४ मधील परिच्छेद क्रमांक ३१२ अन्वये मूळ वारस प्रमाणपत्रावर टिप नमूद करावी.

४. अर्जदारांनी आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहिर).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2026.04.06 15:16:00 +0530

स्थळ : अहमदपूर.
दिनांक : ०६.०४.२०२६.

(एम. सी. हासगे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
अहमदपूर.